**सार्वजनिक आरोग्य विभाग**

गो. ते. रुग्णालय संकुल इमारत,

१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई ४०० ००१

दिनांक : ०९ सप्टेंबर, २०२१.

# अधिसूचना

**भारताचे संविधान :-**

क्र.सेप्रनि /दंत सहायक गट-ड/प्र.क्र.४२/सेवा-५. - भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील **"दंत सहायक गट-ड"** या पदांच्या सेवाभरतीचे विनियमन करणारे पुढील नियम करीत आहेत जसे :-

१. या नियमांस, महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक आरोग्य विभागाच्या नियंत्रणाखालील आरोग्य सेवा आयुक्तालयातील **"दंत सहायक गट-ड"** (सेवा प्रवेश) नियम, २०२१ असे संबोधण्यात यावे.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ आवश्यक नसेल तर, -

(क) "आयुक्तालय" याचा अर्थ, आरोग्य सेवा आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, असा आहे;

(ख) "विभाग" याचा अर्थ, महाराष्ट्र शासनाच्या अंतर्गत असलेला सार्वजनिक आरोग्य विभाग, असा आहे;

(ग) "शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे;

(घ) "मान्यताप्राप्त विश्वस्त रुग्णालय" याचा अर्थ, महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० (१९५० चा २९) अन्वये नोंदणी केलेले रुग्णालय, असा आहे;

(ङ) "माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा" याचा अर्थ महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे अधिनियम, १९६५ (१९६५ चा महा. ४१) अन्वये घटित केलेल्या एखाद्या विभागीय मंडळाने घेतलेली उच्च माध्यमिक शालांत प्रामणपत्र परीक्षा, असा आहे आणि यामध्ये शासनाने, तिच्याशी समकक्ष असल्याचे घोषित केलेल्या इतर कोणत्याही परीक्षेचा समावेश होतो.

३. दंत सहायक, गट-ड या पदावरील नियुक्ती जिल्हा शल्य चिकित्सकांमार्फत सरळसेवेद्वारे पुढील उमेदवारांमधून करण्यात येईल की, -

(क) ज्यांचे वय अठरा वर्षापेक्षा कमी व अडतीस वर्षापेक्षा अधिक नाही:

परंतु, मागासवर्गातील उमेदवारांसाठी कमाल वयोमर्यादा पाच वर्षापर्यंत शिथिल असेल; आणि

(ख) जे मान्यता प्राप्त मंडळातील माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण आहेत.

(ग) उमेदवारांची निवड करताना, शासकीय दंत महाविद्यालय, शासकीय रुग्णालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय किंवा स्थानिक स्वराज्य संस्था किंवा महानगरपालिका यांच्या अंतर्गत असलेले दंत चिकित्सालय किंवा मान्यता प्राप्त विश्वस्त रुग्णालये यांमधील दंत सहायक म्हणून दोन वर्षाचा कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.

४. नियम ३ येथे नमूद केलेल्या पदावर नियुक्ती केलेली व्यक्ती, जिल्ह्यात कोठेही बदलीस पात्र असेल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(डॉ. प्रदीप व्यास)
अप्पर मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
४) मा. राज्यमंत्री (आरोग्य व कुटुंब कल्याण), मंत्रालय, मुंबई.
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक, राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, राज्य आरोग्य हमी सोसायटी, वरळी, मुंबई.
८) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व).
९) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई / पुणे.
१०) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
११) उपसंचालक, आरोग्य सेवा (सर्व).
१२) जिल्हा शल्य चिकित्सक (सर्व).
१३) जिल्हा आरोग्य अधिकारी (सर्व).
१४) जिल्हा हिवताप अधिकारी (सर्व).
१५) प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहायक.
१६) निवड नस्ती (सेवा-५).

## NOTIFICATION

Public Health Department,
G.T. Hospital Complex Building,
10th floor, Mantralaya, Mumbai 01
Dated the 09th September, 2021.

Constitution of India.

No. RTR-2019/Dental Assistant Group D/CR 42/Seva 5. - In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the posts of Dental Assistant, Group D in the Commissionarate of Health Services under the Public Health Department of the Government of Maharashtra, namely:-

**1.** These rules may be called the Dental Assistant, Group - D in the Commissionarate of Health Services under the Public Health Department of the Government of Maharashtra (Recruitment) Rules, 2021.

**2.** In these rules, unless the context requires otherwise,-

*(a)* "Commissionarate" means the Commissionarate of Health Services, Maharashtra State;

*(b)* "Department" means the Public Health Department, under the Government of Maharashtra;

*(c)* "Government" means the Government of Maharashtra;

*(d)* "Recognized trustee hospital" means hospital registered under the Maharashtra Public Trust Act (XXIX of 1950);

*(e)* "Secondary School Certificate Examination" means the Secondary School Certificate Examination conducted by a Divisional Board constituted under the Maharashtra Secondary Education Board Act, 1965 (Mah. XLI of 1965) and includes any other examination declared by Government to be equivalent thereto.

**3.** Appointment to the post of Dental Assistant shall be made by District Civil Surgeon through nomination from amongst the candidates who,-

*(a)* are not less than eighteen years of age and not more than thirty eight years of age:

Provided that, the upper age limit shall be relaxed upto five years in case of candidates belonging to Backward Classes; and

*(b)* Have passed the Secondary School Certificate Examination from the recognized Board.

*(c)* While selecting the candidates preference will be given to the candidates having minimum two years experience as Dental Assistant in the Government Dental College, Government Hospital, Dental Clinic under Directorate of Medical Educational and Research or Local Self Government Bodies, Municipal Corporation or recognized Trustee Hospitals.

**4.** A person appointed to the post shall be liable for transfer within the District.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

Pradeep Vyas

(Dr. Pradeep Vyas)
Additional Chief Secretary
Government of Maharashtra

Copy to,

1) Principal Secretary to Hon'ble Governor, Rajbhavan, Mumbai.
2) Principal Secretary to Hon'ble Chief Minister, Mantralaya, Mumbai.
3) Hon'ble Minister (Health & Family Welfare), Mantralaya, Mumbai.
4) Hon'ble Minister of State (Health & Family Welfare), Mantralaya, Mumbai.
5) Chief Secretary, Mantralaya, Mumbai.
6) Commissioner, Health Services Cum Mission Director, National Health Misssion, Mumbai.
7) Chief Executive Officer, State Health Assurance Society, Worli, Mumbai
8) Chief Executive Officers, Zilla Parishad (All)
9) Director, Health Services, Mumbai/Pune
10) Joint Director, Health Services (All)
11) Deputy Directors, Health Services (All)
12) Civil Surgeons (All)
13) District Health Officers (All)
14) District Malaria Officers (All)
15) PA to Principal Secretary, Public Health Department, Mantralaya, Mumbai.
16) Select File: Seva 5.